POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२७३ ● मुंबई, सोमवार, ०५ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## बारावीचा निकाल आज जाहीर होणार
## कुठे आणि कसा पाहायचा, सविस्तर वाचा...

**मुंबई I प्रतिनिधी :**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. सोमवारी ५ मे रोजी बारावीचा निकाल जाहीर होणार आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल असून ५ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थी बोर्डाच्या संकेतस्थळावर रिझल्ट पाहू शकणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडाळामार्फत बारावीचा निकाल सोमवारी ऑनलाइन पद्धतीने जाहिर करण्यात येणार आहे. परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळावरुन उपलब्ध होतील. त्यानंतर विद्यार्थी या माहिती प्रिंटदेखील काढू शकतात. तसंच, डिजीलॉकर ॲपमध्ये डिजीटल रिझल्ट संग्रहीत करुन ठेवण्याची सोयदेखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.



**या लिंकवर निकाल पाहा**

- https://results.digilocker.gov.in
- https://mahahsscboard.in
- http://hscresult.mkcl.org
- https://results.targetpublications.org
- https://results.navneet.com

**कसा पाहाल निकाल?**

- सगळ्यात आधी बोर्डाच्या अधिकृत बेवसाइटवर जा.
- होमपेजवर 'महाराष्ट्र एसएससी/एचएससी निकाल २०२५' लिंक दिसेल. त्याला क्लिक करा.
- क्लिक करताच नवीन विंडो ओपन होईल. त्याठिकाणी सीट नंबर आणि इतर माहिती भरुन ह्यसबमिटह्व बटनवर क्लिक करा.
- त्यानंतर तुमचा बोडार्चा निकाल स्क्रीनवर दिसेल.

**१० मे रोजी दहावीचा निकाल?**

दहावी, बारावीच्या लेखी परीक्षा दर वर्षीपेक्षा यंदा दहा दिवस लवकर सुरू झाल्या. विद्यार्थ्यांना पुढील करिअरच्या दृष्टीने नियोजनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून परीक्षेसोबतच निकाल देखील लवकर जाहीर केला जाणार आहे. त्यामुळं साधारणपणे एसएससी बोर्डाचा निकाल हा पुढच्या आठवड्यात सोमवार ते शुक्रवार या कालावधीत कधीही लागू शकतो. निकाल १५ मे च्या आतच लागणार, अशी माहिती एसएससी बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली आहे.

## पाकिस्तानविरुद्ध कारवाईची तयारी?
### नौदल प्रमुखांनंतर आता हवाई दल प्रमुखांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**मुंबई I प्रतिनिधी :**

२२ एप्रिलला जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्य सध्या तणावाची स्थिती आहे. याच पार्श्वभूमीवर, एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यामध्ये हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांनी पंतप्रधानांची भेट घेतली होती.



शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या लोक कल्याण मार्गावरील निवासस्थानी भेट घेतली होती. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर हवाई दल प्रमुख आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील ही बैठक झाली. त्या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण प्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान आणि तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख उपस्थित होते. त्या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल देखील उपस्थित होते.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या एक दिवसानंतर सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) बैठक झाली. या हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सरकारने दहशतवादाचा नाश करण्याच्या भारताच्या राष्ट्रीय संकल्पाचा पुनरुच्चार केला आहे. दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल असा इशारा सरकारकडून देण्यात आला आहे. सरकारने सशस्त्र दलांना पूर्ण ''ऑपरेशनल स्वातंत्र्य'' दिले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. दहशतवाद्यांवर सरकारने केलेल्या कोणत्याही कारवाईला विरोधी पक्षांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे.

सीसीएसला माहिती देताना सांगण्यात आले की दहशतवादी हल्ल्याचे सीमेपलीकडे संबंध आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील यशस्वी निवडणुका आणि आर्थिक विकासाच्या दिशेने प्रगती झाल्यानंतर हा हल्ला झाल्याचे बोलले जात आहे. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला कडक संदेश देण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. यामध्ये सिंधू पाणी करार स्थगित करणे देखील समाविष्ट आहे.

**गुरुवार दि. ८ मे रोजी**
**''थॅलेसिमियामुक्त महाराष्ट्र''**
**अभियान विविध डॉक्टरांचे तज्ञांचे विचार**
**उपाय व घ्यावयाची काळजी यावर**
**संपूर्ण भारतातून तज्ञांचे लेख अवश्य वाचा.**

## हवामानात मोठा बदल
### धोक्याची घंटा वाजवत महाराष्ट्रात अलर्ट

**मुंबई I प्रतिनिधी :**




महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये आयएमडीकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाकडून भंडारा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यामध्ये वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर दुसरीकडे अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात ४०-५० किमी प्रति तास वेगानं वारे वाहन्याची शक्यता आहे.

दरम्यान दुसरीकडे महाराष्ट्रसह इतर राज्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, सिक्कम आणि जम्मू-काश्मीरच्या देखील काही भागांमध्ये जोरदार पाऊस पाडण्याची शक्यता आहे. पाऊस पडण्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. मात्र हवेत गारवा निर्माण होऊन उष्णतेपासून नागरिकांना दिलासा मिळू शकतो. या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## 'वेव्हज'मध्ये ८ हजार कोटींचे करार... नवी मुंबईत 'एज्यु सिटी'
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वेव्हज' परिषदेत घोषणा

**मुंबई I प्रतिनिधी :**

विकसित भारताच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले आहेत. नवी मुंबईत आकाराला येत असलेल्या 'एज्यु सिटी'मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची विद्यापीठे येतील आणि परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न आता येथेच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. याशिवाय चित्रपट उद्योग क्षेत्रात झालेले करार चित्रपट निर्मिती क्षेत्राला अधिक उंचीवर नेतील, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वेव्हज २०२५ परिषदेमध्ये शुक्रवारी आठ हजार कोटी रुपयांचे विविध सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी सिडकोमार्फत युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याबरोबर प्रत्येकी १५०० कोटी रुपयांचा करार करण्यात आला. तसेच राज्याच्या उद्योग विभागामार्फत प्राइम फोकस कंपनीसोबत ३००० कोटी रुपयांचा आणि गोदरेजसोबत २००० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन, सिडकोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह आदी उपस्थित होते.




जगातील दोन सर्वोत्तम विद्यापीठांसोबत शुक्रवारी सामंजस्य करार होत आहे. नवी मुंबईत सुरू होत असलेल्या 'एज्यु सिटी'मध्ये जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठे एकाच ठिकाणी येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांत शिकण्याचे येथील युवकांचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

जगभरात भारतीय चित्रपटसृष्टी व कला यांची मोठी लोकप्रियता आहे. आपल्याला सर्वोत्तम व्हायचे आहे, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायचे आहे आणि आपल्या प्रतिभावान तंत्रज्ञांच्या कौशल्यातून नवनिर्मिती करायची आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, प्राइम फोकस आणि गोदरेज यांच्यासोबतच्या करारांमुळे आपले उद्दिष्ट पूर्ण होईल. विश्वास, गुणवत्ता आणि विश्वासार्हतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांमध्ये 'गोदरेज'चे नाव अग्रगण्य आहे. गोदरेजकडून उभारला जाणारा स्टुडिओ सर्वोत्तम ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. करार झालेल्या सर्व संस्थांना राज्य शासनाच्या वतीने आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन यांनी, प्राइम फोकसच्या वतीने संचालक नमित मल्होत्रा यांनी तर गोदरेजच्या वतीने महाव्यवस्थापक हरसिमरन सिंग यांनी करारावर स्वाक्षरी केली.

**पनवेलला 'एए स्टुडिओ'**

'गोदरेज'सोबत पनवेल येथे एए स्टुडिओ स्थापन करण्याबाबत करार झाला. या कराराचा पहिला टप्पा ५०० कोटी रुपये गुंतवणुकीचा असून याद्वारे (प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष) ६०० रोजगार निर्मिती होईल. हा प्रकल्प २०२७ मध्ये सुरू होईल. पुढील टप्प्यात १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून यामध्ये १९०० रोजगार निर्मिती होईल. हा टप्पा २०३० पर्यंत सुरू होईल. या माध्यमातून एकूण २ कोटी रुपयांची गुंतवणूक, तर २,५०० रोजगार निर्मिती होईल.

**प्राइम फोकसची ३ हजार कोटींची गुंतवणूक**

उद्योग विभाग आणि 'प्राइम फोकस' तसेच 'गोदरेज फंड मॅनेजमेंट अँड इन्व्हेस्टमेंट अडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपन्यांशी स्वतंत्रपणे सामंजस्य करार करण्यात आले. 'प्राइम फोकस'सोबत जागतिक दर्जाच्या स्टुडिओची इकोसिस्टिम तयार करण्याच्या दृष्टीने करार करण्यात आला असून यामध्ये प्रस्तावित गुंतवणूक ३००० कोटी रुपये असणार आहे. या माध्यमातून सुमारे २५०० लोकांना थेट रोजगार उपलब्ध होईल. हा प्रकल्प २०२५-२६ मध्ये सुरू होईल.

**ऑस्ट्रेलिया, यॉर्कबरोबर करार**

सिडको मार्फत नवी मुंबई येथे एज्यु सिटी प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क यांचे कॅम्पस स्थापन करण्याच्या उद्देशाने दोन्ही संस्थांशी स्वतंत्रपणे प्रत्येकी १५०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. सिडकोच्या वतीने अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, ह्युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाह्वच्या वतीने कुलगुरू डॉ. डायने स्मिथ-गँडर आणि ह्युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्कह्वच्या वतीने कुलगुरू चार्ली जेफ्री यांनी करारावर स्वाक्षरी केली.

## रात्रपाळीहून घरी येताच पायाखालची जमीनच सरकली
## भिवंडीत पत्नीसह पोटच्या दोन्ही मुली लटकलेल्या अवस्थेत

**नक्की घडले काय?**

लालजी रात्रपाळीसाठी कामावर गेला होता सकाळी नऊ वाजताच्या सुमारास तो घरी परतला असता घरचा दरवाजा आतून बंद होता. अनेक वेळा दरवाजा वाजवून ही पत्नीने दरवाजा न उघडल्याने पती लालजी याने छोट्या खिडकीतून आत डोकावून पाहिले असता त्याच्या पायाखालची जमीन सरकली. हतबल झालेल्या लालजीने टाहो फोडत दरवाजा उघडला असता आत मध्ये छताच्या लोखंडी अँगलवर गळफास घेऊन आत्महत्या केलेले मृतदेह आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस बीट मार्शल यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर भिवंडी शहर पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी महिला अधिकारी यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात रवाना केले आहेत.घटनास्थळी आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये असे लिहिलेली चिठ्ठी मिळाली आहे.नक्की महिलेने मुलींसह आत्महत्या का व कोणत्या कारणांमुळे केली हे अजून स्पष्ट नसले तरी पोलिस अनेक बाजूने या आत्महत्येचा तपास करण्यात गुंतले आहेत. अशी माहिती भिवंडी शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिलीय.




**भिवंडी I प्रतिनिधी :**

भिवंडी शहरातील फेणे गावात पती रात्रपाळीसाठी कामावर गेलेला असताना पत्नीने तिन्ही मुलींसह घरात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. पती सकाळी कामावरून घरी परत आल्यावर ही घटना उघडकीस आली. फेणे गावातील एका चाळीत हा प्रकार समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी जात पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना करण्यात आले आहेत. घटनास्थळी एक चिठ्ठी मिळाली असून त्यात आत्महत्येसाठी कोणालाही जबाबदार धरू नये असे लिहिले आहे. नक्की महिलेने कोणत्या कारणास्तव आपल्या मुलींसह ही आत्महत्या केली हे अद्याप स्पष्ट नसून घटनेचा अधिक तपास सुरु आहे. भिवंडीतील फेणे गाव येथील एका चाळीत लालजी बनवारीलाल भारती हा यंत्रमाग कामगार असून पत्नी पुनिता (वय ३२) व मुली नंदिनी (वय १२),नेहा (वय ०७) व अनु (वय ०४) यांसोबत राहत होता.

**झाडाला लटकलेल्या तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ**

उल्हासनगर कॅम्प क्रमांक पाचमधील प्रेम नगर टेकडी परिसरात एका तरुणाचा झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. सौरभ गायसमुद्रे असे मृत तरुणाचे नाव असून, ही आत्महत्या नसून त्याची हत्या करण्यात आली आहे, असा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रेमनगर टेकडी परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या जंगलामध्ये स्थानिक नागरिकांना झाडाला लटकलेला तरुणाचा मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ पोलीस आणि स्थानिक प्रतिनिधींना कळवले. घटनेची माहिती मिळताच हिललाइन पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात पाठवण्यात आला. या प्रकरणात मृत सौरभचे कुटुंबीय अतिशय भावनिक अवस्थेत आहेत. त्यांनी थेट पोलिसांसमोर आरोप करत सांगितले की, सौरभने स्वतःहून असे पाऊल उचलण्याचा प्रश्नच येत नाही. त्याला फसवून, मारहाण करून गळफास लावण्यात आला आहे.



**धाराशिवमध्ये २४ लाखांची ऑनलाईन फसवणूक**

धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील एका दूध डेअरी चालकाची लाखो रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तानाजी दत्तु भोसले असं ऑनलाईन फसवणूक झालेल्या दूध डेअरी चालकाचं नाव आहे. २४ लाखांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी धाराशिव सायबर पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दूध डेअरी चालक तानाजी दत्तु भोसले यांना व्हाट्सअॅप फाईल पाठवण्यात आली. त्यानंतर ती फाईल डॉउनलोड केली व दूध संस्थेच्या खात्यातील पैसे लुटण्यात आले. भोसले यांच्या मोबाईलवर बॅंकेतून बोलत आहे असे सांगून तुमचे आय. सी. आय. बँक खाते आपडेट करायचे आहे असा बनाव करुन आधार कार्ड व पॅन कार्डची माहिती घेण्यात आली. तसेच व्हॉटसअपवर आय डी बी आय बँक एक फाईल पाठवून ती डाउनलोड करण्यास लावले. यानंतर येडेश्वरी दुध डेअरीचे आयसीआयसीआय बँक खात्यातून २४ लाख ४७ हजार ५५८ रुपये ऑनलाईन फसवणूक करुन काढनू घेण्यात आले.

## वर्षभरात बीड जिल्ह्यात ९ कोटी ३९ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक
## एकूण ९० गुन्हे सायबर पोलीस ठाण्यात दाखल

**बीड I प्रतिनिधी :**

बीड जिल्ह्यात ऑनलाइन फसवणुकीच्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. २०२४ या गतवर्षात सायबर भामट्यांनी ९ कोटी ३९ लाख रुपये हडपले आहेत. त्यातील केवळ ८७ लाख २९ हजार रुपये परत मिळवून देण्यात सायबर पोलिसांना यश आलं आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेच्या निलंबनापासून सायबर विभाग चर्चेत आहे. अशातच कासलेनंतर मागील आठवड्यात दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे.

**एकूण ९० गुन्हे सायबर पोलीस ठाण्यात दाखल**

२०२४ मध्ये वेगवेगळ्या माध्यमातून फसवणूक झाली असून यामध्ये बोगस वेबसाईट, बोगस कस्टमर केअर, बोगस लिंक, लॉन ॲप इतर माध्यमातून फसवणूक झाली. या प्रकरणात एकूण ९० गुन्हे सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, या घटनांमुळे पोलिस प्रशासन सतर्क झालं आहे. अशा गुन्ह्यामध्ये सापडणाऱ्या कडक शिक्षा करण्याची मागणी देखील केली जात आहे.




दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सर्रास मोबाईलवरुनच फसवणूक होत असल्याचे दिसत आहे. विविध कारणं सांगून नागरिकांना विश्वासात घेतलं जातं. त्यानंतर त्यांच्याकडून बँकेच्या खात्यासंदर्भात माहिती घेऊन त्यांची फसवणूक केली जात आहे. याप्रकरणी विविध ठिकाणी गुन्ह्यांची नोंद देखील करण्यात आली आहे. दरम्यान, असा गुन्ह्यात फसवणूक होऊ नये म्हणून नागरिकांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

## पतीला चोरांनी बेदम मारहाण करत लुटलं
### ९६ हजारांचा मुद्देमाल लंपास... तपासात धक्कादायक सत्य उघड

**अमरावती I प्रतिनिधी :**

जमाना इतका बदललाय की कधी कुठे काय घडेल, कोणती बातमी समोर येईल याचा काही नेम नाही. अमरावतीत अशीच एक घटना घडली आहे. एका पत्नीनं पतीला लुटण्याचा कट आखला. त्यासाठी १२०० रूपयांची सुपारी दिली. काय नेमकं आहे हे प्रकरण, जाणून घ्या.

सध्या पत्नीनं पतीला संपवलं, अशा बातम्या सातत्यानं समोर येत असताना अमरावतीमधल्या एका घटनेची सर्वत्र चर्चा रंगली आहे. एका पत्नीनं स्वतःच्याच पतीला लुटण्यासाठी आणि बेदम मारण्यासाठी 1200 रूपयांची सुपारी दिली. नवरा बायकोमधल्या वादाचं कारण कळलं तर तुम्हीही आश्चर्यचकित व्हाल. कारण या पती पत्नीमध्ये वादाचं कारण मालमत्ता होतं.



- २५ एप्रिलला ३१ वर्षीय अजय राठी पत्नीसह मोपेडवरून जाताना तीन चार जणांचा हल्ला
- हॉकी स्टीकनं अजयला बेदम मारहाण
- गळ्यातली चेन आणि दोन अंगठ्या असा एकूण ९५ हजार रूपयांचा ऐवज लुटला
- अजय राठीची पोलीस ठाण्यात धाव
- तपासादरम्यान हल्ला पूर्वनियोजित असल्याची माहिती
- पत्नीनंच १२०० रुपए देऊन पतीला मारायची सुपारी

पण पत्नीनं असं का केलं यामागचं कारण समोर येताच पोलीसही चक्रावले. या दोघांचं अरेंज मॅरेज झालं होतं पण ते कॉन्ट्रॅक्ट मॅरेज होतं, अशी माहिती समोर आली आहे. मालमत्तेचा हिस्सा तसंच दरमहा १५ हजार रुपए पत्नीला देणार तसंच महिन्यातून एकदा माहेरी जाता येणार असा तोंडी करार त्यांच्यात झाला होता. लग्नानंतर अजयनं पैसे द्यायला नकार दिला. त्या रागापोटी त्याच्या पत्नीनं हा कट रचला आणि सुपारी दिली. यात तिला तिच्या मावस भावानंही साथ दिली. मारहाण करणा-यांमध्ये मावसभाऊ आणि त्याचे दोन मित्र आहेत. पोलिसांनी याचा छडा लावला आणि त्या पत्नीसह तिघांनाही अटक केलीय.

पैशाच्या मोहापायी नवऱ्याला अद्दल घडवण्यासाठी सुपारी देणाऱ्या पत्नीची कीव येतेय.. नाती खरंच इतकी तकलादू झालीयत का.. आपण माणूसपण हरवत चाललोय का.. याचा विचार व्हायला हवा...



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मुंबईत रस्ते प्रवासाचे अग्निदिव्य

मुंबईत वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढू लागली आहे. शहरातील शंभरहून अधिक वर्षे जुने धोकादायक उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे मुंबईत वाहतूककोंडीतून मार्ग काढताना वाहनचालकांना अग्निदिव्य करावे लागणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून दररोज किमान ६०० लोक नोकरीसाठी मुंबईत येतात, असा अंदाज आहे. मुंबईत माणसांचे लोंढे अविरतपणे सुरू आहेत. याचा पायाभूत सेवासुविधांवर ताण येत आहे. यामुळे वाढत्या लोकसंख्येमुळे शहर उपनगरांचा श्वास कोंडला जाऊ लागला आहे. लोकल, रस्ते मार्गाने प्रवास करणे जिकीरीचे झाले आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढू लागली आहे. शहरातील शंभरहून अधिक वर्षे जुने धोकादायक उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे मुंबईत वाहतूककोंडीतून मार्ग काढताना वाहनचालकांना अग्निदिव्य करावे लागणार आहे. रेल्वे मार्ग ओलांडण्यासाठी दक्षिण मुंबईत ब्रिटिश काळात उड्डाणपूल उभारण्यात आले. यापैकी बहुतांश उड्डाणपूल मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर आहेत. या पुलांचे आयुर्मान झाल्याने ते जीर्ण झाले आहेत. दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर असे उड्डाणपूल तोडून नव्याने पूल उभारण्यात येत आहेत. उड्डाणपुलावरील वाहतूक बंद करताच त्या परिसरात प्रवाशांना प्रचंड वाहतूककोंडीला सामोरे जावे लागते. अंधेरी पूर्व पश्चिमेला जोडणारा गोखले उड्डाणपूल वाहतुकीस बंद केल्यानंतर पश्चिम उपनगरातील वाहनचालकांना वाहतूककोंडीच्या अग्निदिव्याला सामोरे जावे लागले. पूर्व-पश्चिम प्रवास करताना प्रवाशांची दमछाक झाली. हा पूल पूर्ण क्षमतेने वाहतूक सेवेत अद्याप आला नसतानाच सायन रेल्वेवरील उड्डाणपूल धोकादायक झाल्याने आणि रेल्वे मार्गिका विस्तारीकरणासाठी बंद करण्यात आला. कुर्ला, सायनकडे जाणाऱ्या वाहनांचा मुख्य मार्गच बंद झाल्याने या मार्गावरील वाहतूक सायन रुग्णालयाजवळील पुलावरून वळविण्यात आली आहे. सायन हॉस्पिटल ते माहीम फाटक हा दोन-तीन मिनिटांच्या प्रवासासाठी अर्ध्या तासाहून अधिक वेळ जातो आहे. वाहतूक वळविल्यानंतर या मार्गावर कुठेही वाहतूक नियंत्रण करण्यासाठी पोलीस क्वचित नजरेस पडतात. यामुळे वाहतूककोंडीतून मार्ग काढणे वाहनचालकांसाठी जिकीरीचे झाले आहे. यातच भरीस भर म्हणून मिठी नदीवरील पुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे सायन ते कलानगर प्रवास प्रवाशांसाठी त्रासदायक बनला आहे. पाच मिनिटांच्या अंतरासाठी एक तास वाहनांमध्ये अडकून पडावे लागत आहे. सायन उड्डाणपुलाची पुराण कथा बंद होत नाही, तोच एलफिन्स्टन पूल पुनर्निर्माणासाठी बंद करण्याची अधिसूचना वाहतूक विभागाने जारी केली आहे. महत्त्वाची रुग्णालये असलेल्या या भागात वाहतूककोंडी नित्याचीच. परंतु हा पूल बंद झाल्यास मुंबईकरांचे होणारे हाल प्रत्यक्ष अनुभवल्यानंतरच समजणार आहेत. या भागातील कोंडी फोडून सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी कोणी वाहतूक पोलीस रस्त्यावर असतीलच, ही भाबडी आशा न बाळगलेली बरी. एलफिन्स्टन पाठोपाठ मुंबईचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या दादरमधील टिळक उड्डाणपुलाचे पुनर्निर्माण करण्याचे सुरू होईल. ही कामे पूर्ण होण्यास अडीच-तीन वर्षांहून अधिक कालावधी लागतो. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूककोंडी, ध्वनी, वायू प्रदूषण या परिणामांही मुंबईकरांना सामोरे जावे लागणार आहे. मुंबईमध्ये अनेक जुने उड्डाणपूल असून, ते जीर्ण झाले आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव या पुलावरून वाहतुकीस निर्बंध घालण्यात येतात. असे १०हून अधिक उड्डाणपूल क्रमाक्रमाने काही वर्षांत वाहतुकीसाठी बंद करावे लागणार आहेत. त्यामुळे मुंबईतील रस्ते प्रवास अतिकठीण ठरणार आहे. महापालिका, वाहतूक विभाग आपापली जबाबदारी पार पाडत असले, तरी मुंबईच्या वाहतूककोंडीवर कोणीही गंभीर असल्याचे दिसत नाही. मंत्र्यांचे ताफे रस्त्यावरून जाण्यासाठी वाहतूक पोलीस इमानेइतबारे कामात झोकून देतात. परंतु मुंबईत अनेक ठिकाणी होणाऱ्या वाहतूककोंडीत नागरिक तासन्‌तास अडकून पडत असताना त्यावर कोणत्याही यंत्रणेचे लक्ष नाही, हे दुर्दैवी म्हणावे लागेल. मुंबईत दररोज नवीन वाहने रस्त्यावर येत आहेत. त्या तुलनेत रस्ते लहान होत चालले आहेत. मुख्य रस्त्यांवर मेट्रो, उड्डाणपूल प्रकल्प उभारण्यात आले आहेत. हे प्रकल्प उभारताना वाहतूककोंडीचा विचार होताना दिसत नाही. वेगवान प्रवास करून वाहने काही मिनिटांत पुन्हा वाहतूककोंडीत अडकत आहेत. नवीन प्रकल्प राबविण्यात येत असले, तरी त्यांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे मुंबईकरांचा प्रवास भविष्यात सुखकर होईल, अशी आशा बाळगल्यास ती फोल ठरणारी असेल. सुमारे ५० लाख वाहने मुंबईत आहेत. गर्दीच्या वेळी मुंबईतील अनेक रस्ते वाहनांच्या कर्णकर्कश आवाजात हरवून जातात. जड वाहनांसाठी रस्त्यावर वेळा निश्चित करून देण्यात आल्या आहेत. मात्र याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. रस्त्यावर होणारी दुतर्फा पार्किंग वाहतूककोंडीस कारणीभूत ठरत आहे. मेट्रोमुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल, असे सांगण्यात येत होते. परंतु रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी झालेली नाही. मुंबईत दररोज नवीन वाहने रस्त्यावर येऊन वाहतूककोंडीत भर घालत आहेत. वाहतूककोंडीवर तोडगा काढण्यासाठी वाहन खरेदीला लगाम घालण्यासाठी परिवहन विभाग विचार करू लागला आहे. मुंबई महानगरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये वाहतूककोंडीने नागरिक त्रस्त होऊ लागले आहेत.

# जातनिहाय जनगणनेची डेडलाईन कधी?

**जात आता सामाजिक नव्हे, तर पूर्णतः राजकीय विषय बनला आहे. राहुल गांधींच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे मोदी सरकारने अखेर जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला. ही जनगणना ओबीसींचे प्रतिनिधित्व, योजनांची अंमलबजावणी व गरजांनुसार धोरण आखण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे; मात्र, जातनिहाय जनगणनेसाठीचा कालबद्ध कार्यक्रम आणि निधीची तरतूद अद्याप केलेली नाही. अद्याप निधी व कार्यक्रम जाहीर न झाल्यामुळे अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह कायम आहे.**

महाराष्ट्रात आणि भारतात आता 'जात' हा काही फक्त सामाजिक विषय राहिलेला नाही, तर तो पूर्णतः राजकीय झालेला आहे. मंडल आयोगापासून जात राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिली आहे. विशेषतः उत्तरेतल्या राजकारणात जातीच्या आधारे प्रादेशिक पक्ष स्थापन झाले आणि सत्तेवरही आले. जातींच्या अस्मितेचे हे मॉडेल राजकारणात यशस्वी ठरले. २०१४च्या निवडणुकीत भाजपनेही आमचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी ओबीसी आहेत हा प्रचार करून मते मागितली. राहुल गांधींनी सातत्याने जातिनिहाय जनगणनेची मागणी केली. पण पंतप्रधानांनी 'एक तो सेफ है'चा नारा देत जातनिहाय जनगणनेची मागणी करणाऱ्यांची अर्बन नक्षली म्हणून खिल्ली उडवली. पण राजकीय यूटर्न घेण्यात पटाईत असणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ११ वर्षांचा विरोध सोडून देत ३० एप्रिल रोजी आगामी जनगणनेसोबत जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला.

स्वातंत्र्यपूर्वी सन १८८१ ते १९३१ ब्रिटिश शासनकाळात जातनिहाय जनगणना झाल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर जातनिहाय जनगणना करायची नाही असा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यानंतरच्या सर्व जनगणनेमध्ये अनुसूचित जाती आणि जमातींचे सर्वेक्षण केले गेले. २०११साली मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने जनगणनेसोबत जातनिहाय सामाजिक आर्थिक सर्वेक्षण केले. पण त्या आकडेवारीत काही चुका आणि तफावत असल्याच्या तक्रारी होत्या. त्याबाबत राज्य सरकारांसोबत मिळून त्या दूर करेपर्यंत केंद्रात सत्ताबदल झाला आणि सत्तेवर आलेल्या मोदी सरकारने ही आकडेवारी जाहीर करणार नाही, अशी भूमिका घेतली. पण गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात विविध योजनांच्या आखणी आणि अंमलबजावणीसाठी याच आकडेवारीचा उपयोग केला.

**राहुल गांधींचा पाठपुरावा**


काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी सातत्याने जातनिहाय जनगणनेचा मुद्दा उपस्थित करत होते. संसद आणि संसदेबाहेर त्यांनी सातत्याने हा मुद्दा लावून धरला. जातनिहाय जनगणना हा समाजाचा एक्स-रे आहे तो केल्याशिवाय खरी स्थिती समजणार नाही. आकडेवारी समोर आल्याशिवाय संख्येइतके प्रतिनिधित्व मिळणार नाही, हे त्यांनी वारंवार सांगितले. काश्मीर ते कन्याकुमारी पदयात्रा व मणिपूर ते मुंबई या भारत जोडो न्याययात्रेच्या माध्यमातून देशभर त्यांनी ही मागणी पोहोचवली, त्यांना जनतेचा पाठिंबाही मिळाला. संसद, राजकीय सभा, संविधान संमेलने, विचारवंत, युवकांशी, विद्यार्थ्यांशी संवादादरम्यान त्यांनी हा मुद्दा लावून धरला. जातीनिहाय जनगणना करावीच लागेल, ती करायला आम्ही तुम्हाला भाग पाडू, असे आव्हान त्यांनी संसदेत मोदींना दिले होते. दरम्यानच्या काळात काँग्रेसशासित तेलंगणा, कर्नाटक आणि काँग्रेस आघाडीच्या बिहार सरकारने जातनिहाय आर्थिक सर्वेक्षण केले. यातून इतर मागासवर्गीयांची संख्या अनुमानापेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बिहार सरकारने आरक्षण ६५टक्के इतके वाढवले. यामुळे इतर राज्यातील मागासवर्गीयांनाही आपली संख्या जास्त आहे अशी भावना झाली व या मागणीला बळ मिळाले. पण पंतप्रधान मोदींनी गरीब, तरुण, महिला व शेतकरी या चार जाती असल्याचे सांगत जातनिहाय जनगणनेला विरोध केला.

**भाजपचे यूटर्न**

नरेंद्र मोदींच्या कार्यकाळातील भाजपचे राजकारण कोणत्याही विचारधारेवर किंवा तत्त्वांवर आधारित नाही, तर ते फक्त 'सत्तामेव जयते'वर केंद्रित आहे. मोदींनी पंतप्रधान होण्यापूर्वी आधार कार्ड, मनरेगा, जीएसटीला प्रचंड विरोध केला. पण सत्तेवर येताच श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. तीन शेतकरी कायदे, जातनिहाय जनगणना या मुद्द्यावर सरकारने कोलांटी मारली. काँग्रेस पक्षाने जातनिहाय जनगणना होऊ दिली नाही, असे तद्दन खोटे विधान माहिती व दूरसंचार मंत्री आश्विनी वैष्णव यांनी केले आणि त्यानंतर देशभरातील भाजप नेत्यांनी त्यांचे विधान ह्लखोटे बोल पण रेटून बोलह्व ही म्हण सार्थ करत आळवले. गेली १० वर्षे आपण जी भूमिका घेतली आज त्याच्या उलट भूमिका घेऊन ती किती सफाईदारपणे वटवली आणि लोकांना कसे फसवले याचा आनंद भाजप नेत्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहताना जनतेने पाहिला आहे.

**विरोधी पक्षांकडून स्वागत**

सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या निर्णयाचे स्वागत केले. काँग्रेस पक्षाने आपला निवडणूक जाहीरनामा न्यायपत्रात जातनिहाय जनगणना करण्याचे व आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचे आश्वासन दिले होते याची आठवण करून देत एका निश्चित कालवधीत हे काम पूर्ण करावे, अशी मागणीही केली.




**जातनिहाय जनगणनेचे फायदे**

जातनिहाय जनगणना झाल्यानंतर देशातील जातींची व त्या जातींच्या लोकांची प्रत्यक्ष संख्या देशासमोर येईल. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती व त्यांना किती प्रतिनिधित्व मिळते आहे, हे समोर येईल. लाभार्थ्यांची नेमकी संख्या कळाल्याने शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला विकास, कुटुंब कल्याण अशा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता येईल. अनेक छोट्या जातींना अद्याप ओळखही मिळालेली नाही त्यांना प्रतिनिधित्व मिळेल. ओबीसींना आरक्षण आहे, पण त्यांची लोकसंख्या किती आहे याची माहिती नाही. त्यांच्या लोकसंख्येचा निश्चित आकडा मिळाल्यामुळे आरक्षण, प्रतिनिधित्व व योजनांतील त्यांचा वाटा निश्चित करता येईल. तालुका, जिल्हा आणि राज्यातली जातींच्या लोकसंख्येचा आकडा कळेल ज्यामुळे स्थानिक गरजांनुसार योजनांची आखणी करता येईल. शेवटच्या घटकांपर्यंत लाभ पोहोचवण्याचे व प्रतिनिधित्व देण्याचे काम सोपे आणि वेगवान होऊ शकेल.

**घोषणा झाली, अंमलबजावणीचे काय?**

सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय तर घेतला आहे, पण त्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम आणि निधीची तरतूद अद्याप केलेली नाही. दर दहा वर्षांनी होणारी जनगणना २०२१ साली व्हायला हवी होती, सरकारने कोविडचे कारण देऊन ती पुढे ढकलली. पण २०२३, २४, २५ या वर्षांत कोरोना नव्हता तरी जनगणना सुरू केली नाही. उलट सरकारने महिला आरक्षणचे बिल संसदेत पास करून हेडलाईन्समधून प्रसिद्धी मिळवली. पण त्याला जनगणनेची डेडलाईन लावली. त्यामुळे महिला आरक्षणाची अंमलबजावणी जनगणना झाल्याशिवाय होणार नाही. २४ डिसेंबर २०१९ रोजी कॅबिनेटमध्ये २०२१ च्या जनगणनेसाठी ८ हजार २५४ कोटी रुपये मंजूर केले, पण अर्थसंकल्पात फक्त ५७५ कोटी रुपये दिले. जातनिहाय जनगणनेसाठी जवळपास १० महिन्यांचा काळ आणि जवळपास १२ हजार कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असेल असे जाणकार सांगतात. सरकारने यासाठीची निधीची तरतूद आणि कालबद्ध कार्यक्रम जाहीर केल्याशिवाय प्रत्यक्ष काम सुरू होणार नाही. त्यामुळे सरकारने हेडलाईन तर दिली, डेडलाईनचे काय? असा प्रश्न या देशातील जनतेला पडला आहे.

# भारतीय राजकारणाचे नवे वळण

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेची घोषणा केल्याने देशातील राजकारण पुन्हा एकदा वेगळ्या वळणाने जाईल किंवा कसे, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. जात वास्तव हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती म्हणजे बंदिस्त वर्ग असल्याचे म्हटले होते. भारतीय उपखंडात जातनिहाय सामाजिक व्यवहारांसोबतच आर्थिक स्तराची वैशिष्ट्यपूर्ण उतरंड देखील जातनिहायच असलेली दिसते. त्यामुळे सद्य परिस्थितीत भारतातील जातींची आर्थिक, सामाजिक परिस्थिती नेमकी काय आहे, हे जोखण्यासाठी संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना आवश्यक आहे. केंद्र सरकारचे अर्थ, कामगार, महिला व बालविकास, समाजकल्याण आदी खात्यांद्वारे होणाऱ्या सर्वेक्षणांमधून समोर येणाऱ्या सांख्यिकीद्वारे जी माहिती मिळते, त्यात या जनगणनेमुळे मोलाची भर पडणार आहे. त्यामुळे बुधवारी केंद्र सरकारच्या राजकीय व्यवहार समितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व इतर नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करायला हवे. ही मागणी देशात मंडल आयोग लागू झाल्यानंतर उत्तर भारतातील ओबीसी जनाधार असलेल्या पक्षांकडून सातत्याने केली जात आहे. यात प्रामुख्याने लालूप्रसाद यादव, नितीश कुमार, मुलायमसिंह ही नावे असली तरी गेले काही दिवस काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील हिरीरीने ही मागणी लावून धरली आहे, तर यातून भारतीय समाज दुभंगला जाण्याची भीती व्यक्त करत ती धुडकावून लावण्याचे काम भाजप नेतृत्व सातत्याने करत आले होते. त्यामुळे अचानक घेतलेल्या या निर्णयामागील राजकीय गणिते व हेतू समजून घेणे गरजेचे आहे. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीस देशाने खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेत जसे मूलगामी बदल झाले तसेच सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जडणघडणीवरही त्याचे दूरगामी परिणाम झाले. भारतीय बाजारपेठ जागतिक स्तरावर खुली झाली. त्यातून नवे उद्योग आले आणि पूर्वी निम्न मध्यमवर्गाच्या जवळ असणारा मध्यमवर्ग श्रीमंत वर्गाच्या शेजारी जाऊन बसला. नव्या गलेलठ्ठ पगारांच्या नोकऱ्या व त्यासाठी गरजेचे असणारे शैक्षणिक धोरण तयार झाले. अगदी शिक्षणापासून ते वैद्यकीय सेवांपर्यंत सरकारची जबाबदारी कमी होत गेली. खासगीकरण म्हणजेच विकास व त्याला पूरक धोरण म्हणजे विकासाभिमुख सरकार, असा एक समज घडवला गेला. दुसऱ्या बाजूला निम्न स्तरावरील जनतेत मोठी उलथापालथ झाली. भारतातील बहुतांश समाज हा शेती व त्यावर आधारित व्यवसायांशी संबंधित होता. नव्या आर्थिक धोरणात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषीबाबत कोणतेही मूलगामी धोरण ठरवले गेले नाही. त्यातून कृषक जातींसमोर मोठे आर्थिक, सामाजिक आव्हान उभे राहिले. या जातींमधील नेतृत्वाला आरक्षण हाच एकमेव हुकमी मार्ग दिसू लागला. महाराष्ट्रात मराठा, उत्तर भारतात जाट, गुजरातेत पाटीदार, आंध्र प्रदेशात कापू आदी शेतकरी जातींमधून आरक्षणाच्या मागण्या होऊ लागल्या. या जातींचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये केल्यास आमचे काय होईल, अशी भीती ओबीसी जातींमधून व्यक्त होऊ लागली. त्यातच इतर मागासवर्गीयांमधील गुज्जर, धनगर आदी जातींमधून त्यांचा समावेश अनुसूचित जमातीत करण्याच्या जोरदार मागण्या होऊ लागल्या. देशात अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी असे एकूण ४९.५० टक्के आरक्षण देण्याची तरतूद आहे. आरक्षणाचा हा टक्का पन्नास टक्क्यांच्या वर जाऊ नये, असे निर्देश इंदिरा सहानी यांनी मंडल आयोग लागू करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आव्हानावर निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे नव्या जातींपुढे उभ्या राहिलेल्या आर्थिक आव्हानांची उपाययोजना आरक्षणातून होऊ शकते, असे कुणाला कितीही वाटले तरी ठरलेल्या टक्केवारीच्या पुढे जाता येणे सध्या शक्य नाही. देशभरात कुठल्या जातीची टक्केवारी किती, ओबीसींची एकूण संख्या किती व त्यातील कोणत्या जातींचा आर्थिक, सामाजिक स्तर आरक्षणातून उंचावला आहे किंवा कसे, हे समजण्याकरिता ही जनगणना उपयोगी ठरणार आहे. अर्थात या जनगणनेचे निकष कोणते असणार, या कळीच्या मुद्द्याबरोबरच यातून समोर येणारी आकडेवारी जनतेसमोर ठेवण्याचे धैर्य सरकार दाखवणार का, हे देखील अत्यंत महत्त्वाचे असणार आहे. यापूर्वी २०११मध्ये मनमोहन सिंग सरकारने केलेली सामाजिक आर्थिक आणि जातगणना असो वा बिहार, तेलंगण, कर्नाटक या राज्यांमध्ये झालेले जात सर्वेक्षण, संपूर्ण आकडेवारी जनतेसमोर ठेवण्याचे धैर्य ना राहुल गांधी यांनी दाखवले, ना नितीश-लालूंच्या पक्षाने. जातनिहाय जनगणनेच्या निमित्ताने लोकशाहीत माहितीचा पहिला अधिकार जनतेचा असल्याने ती माहिती सार्वजनिक व्हावी, याची केंद्र सरकारने आठवण ठेवली तरी पुष्कळ!

# सर्जिकल स्ट्राईक, युद्ध की आणखी काही?

**पहलगाम हल्ल्यानंतर भारतवासीयांच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या आहेत. 'होऊन जाऊ द्या एकदाचे', 'पीओके आता घेऊनच टाका', 'करा एक घाव आणि दोन तुकडे' अशा घोषणा आणि सोशल पोस्टचा सुळसुळाट आहे. भारत सरकार आणि सैन्य दलांवर कमालीचा दबाव निर्माण झाल्याने आता काय होणार? सर्जिकल स्ट्राईक, युद्ध की आणखी काही?**




काश्मीरमध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतात जेवढी संतापाची लाट उसळली आहे, तेवढीच अपेक्षांची सुद्धा. बहुमतात असलेले एनडीए सरकार आता कठोर निर्णय घेईल आणि सैन्य दले अचूक कारवाई करतील, असा विश्वास भारतीयांना आहे. पुलवामा हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राईकद्वारे पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची स्थळे उद्ध्वस्त करण्यात आली. आताही तशाच प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक होणार का? की पाकव्याप्त काश्मीर पुन्हा आपल्या ताब्यात मिळविण्यासाठी युद्ध छेडले जाणार? की पाकिस्तानचे दोन तुकडे करणारा काहीतरी जबरदस्त संघर्ष सुरू होणार? अशा बहुविध चर्चा सुरू झाल्या आहेत. आततायी माध्यमांकडून अतिरंजित वृत्तांची बरसात केली जात आहे. अखेर केंद्र सरकारकडून विशेष नियमावली जारी करून माध्यमांना जबाबदारीची जाणीव करून दिली गेली आहे. दिल्लीत बैठकांचा सिलसिला कायम असल्याने केवळ भारतवासीयांचेच नाही, तर जगाचेही लक्ष भारत-पाककडे लागले आहे.

सर्वप्रथम हे लक्षात घ्यायला हवे की, छुपे किंवा थेट युद्ध पुकारून दहशतवाद संपुष्टात येत नाही. अनेकांना वाटते की, भारताने मोठी कारवाई केली की दहशतवादी हल्ले बंद होतील किंवा पाकव्याप्त काश्मीर भारतात आले की, काश्मीर खोरे शांत होईल; मात्र, असे काहीच होण्याची सुतराम शक्यता नाही. आजवरचा इतिहास धुंडाळला, तर लक्षात येईल की, युद्ध, संघर्ष किंवा आक्रमणाने कुठलाही प्रश्न कायमस्वरूपी मिटलेला नाही. उलट त्यातून असंख्य धुमारे फुटतात. जखम चिघळते आणि वेदनांची ठसठस तेवढी उरते. कुठल्याही देश किंवा प्रदेशातील वादाकडे पाहिल्यास त्याची खात्री मिळते.

सामरिकशास्त्रातील काही तज्ज्ञांच्या मते, भारत-पाक यांना युद्धात खेचण्यासाठी पहलगाम हल्ला घडविण्यात आला आहे. त्याचा सूत्रधार चीन असू शकतो. भारताशी त्याचे फारसे सख्य नाही. दिवाळखोर पाक त्याला सर्वांगाने हवा आहे. शिवाय भारत हा जगातील तिसरी अर्थव्यवस्था होणार आहे. पहिल्या दोघात अमेरिका आणि चीन हेच आहेत. महासत्ता वाटचालीत चीनला केवळ भारताचा अडथळा आहे. कारण, भारताची बाजारपेठ आणि क्षमता. त्यातच भारतात बहुमताचे सरकार कार्यरत असून, लोकशाही व्यवस्था सुद्धा बळकट आहे. त्यामुळे भारताला शह देण्यासाठी पाक व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचा वापर करण्यात आला. याद्वारे भारत व पाक युद्धात उतरतील. पाक थेट चीनला शरण जाईल. तसेच, भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल, विकासाचा वेग मंदावेल आणि जीवितहानीही मोठी होईल. म्हणजेच, एखाद्या षडयंत्राला आपण बळी पडत आहोत का? याचा विचारही प्रत्युत्तर देताना करावा लागणार आहे.

युद्ध हे कुणालाही परवडणारे नसते. त्याची किंमत वसूल केली जातेच. भारत-पाक युद्ध झाले, तर सरकार जनतेवरील करात वाढ करू शकते. याचा परिणाम नागरिकांच्या खर्च आणि गुंतवणूक यावर होईल किंवा भारत सरकार कर्जही घेऊ शकते. ते कुणाकडून घेणार? यातून कर्जबाजारीपणाचा रोग येणार. सरकार दिवाळखोरीच्या दिशेने जाऊ शकते. किंवा नोटा छापण्याचा पर्याय आहे. यातून चलन फुगवटा वाढेल. युद्धामुळे महागाई वाढते. जनता होरपळून निघते. आताच्या घडीला युद्ध पुकारणे योग्य आहे का? याचा सारासार विचार सरकारला करावाच लागेल. विशेष म्हणजे, युद्ध सुरू करणे सोपे आहे पण ते थांबवणे अवघड. केव्हा आणि कसे थांबवायचे याचा निर्णय घेणे अतिशय कठीण असते. तसेच त्यात किती कालापव्यय होईल? हे सांगता येत नाही.

दोन देशांमध्ये युद्ध सुरू झाले की, अन्य देश त्यांचे हिशोब चुकते करण्याची संधी शोधतात. त्यातूनही युद्धग्रस्त देशांना मोठी झळ पोहचते. याचा मागमूसही त्या देशांना लागत नाही. तसेच, सद्यस्थितीत भारताने युद्ध छेडले, तर संरक्षण सामग्रीची मोठी मागणी तयार होईल. त्याचा पुरवठा कुठून आणि कसा होणार? देशांतर्गत संरक्षण उत्पादने होत असले, तरी त्याचे प्रमाण कमीच आहे. रशियासारख्या देशाकडून आपण बहुतांशी उत्पादने व सामग्री घेतो. सध्या रशियाच युक्रेनसोबतच्या युद्धात गुंतला आहे. तेथे त्यांचेच वांदे आहेत. त्यामुळे भारताला संरक्षण उत्पादनांचा पुरवठा होणे शक्य नाही.

ऐनवेळी अन्य देशांकडून ती घ्यायची ठरली, तर तो पर्याय भारत स्वीकारेल का? भारतीय शस्त्रास्त्रांना ऐनवेळचे सुटे भाग योग्य ठरतील का? मागणी आणि पुरवठ्याचे संतुलन बिघडले की, दर अवाक्याबाहेर जातात. या समस्येलाही तोंड द्यावे लागेल. कारगील युद्धाचा इतिहास पाहिला, तर काही देशांनी आपल्याला जुनाट, कामचलाऊ निकृष्ट दर्जाची किंवा बिघडलेली शस्त्रास्त्रे विकली होती. त्यावेळी आपल्याला नितांत गरज होती. शस्त्रास्त्रे मिळूनही त्याचा फायदा झाला नाही. असाच प्रकार आताही घडू शकतो.

एखादा पट्टीचा मल्ल आक्रमक चिथावणी देऊन दुसऱ्या मल्लाला आखाड्यात येण्यास भाग पाडतो. आताची स्थिती तशीच आहे का? हे सुद्धा पडताळून पहायला हवे. जेव्हा आपल्याला राग येतो त्यावेळी रागातील सर्वप्रथम कृती ही घातकच असते. तावातावात घेतलेले निर्णय अंगलट येतात. बाण सुटून गेल्यावर काहीच करता येत नाही. तो कुठे? कसा? आणि केव्हा? सोडायचा याचे भान असायला हवे. तसेच, स्टेडियममध्ये प्रेक्षक किंवा चाहते हे आपल्या आवडत्या खेळाडूचा प्रचंड जयघोष करतात. त्यांच्या अपेक्षा आणि दबावाकडे खेळाडूने लक्ष दिले, तर त्याचे लक्ष विचलित होते आणि त्याचा बळी जातो. अशाच प्रकारे सध्या देशवासीयांच्या आशा-अपेक्षा पाहता भारत सरकार आणि सैन्य दलांनी सबुरीने निर्णय घेणे गरजेचे आहे. आततायीपणा हा अचूक परिणाम साधत नाही.

आता प्रश्न निर्माण होतो की, पाकिस्तानला धडा शिकवायचा नाही का? दहशतवादी हल्ला झाला तरी युद्धाचे परिणाम जाणून गप्प बसायचे का? तर बिल्कूल नाही. उलट आपण थंड डोक्याने विचारपूर्वक आणि चाणाक्ष खेळी करून त्याचा बदला घ्यायला हवा. महागाई, दारिद्र्य अशा असंख्य समस्यांनी ग्रस्त पाकला जेरीस आणण्यासाठी अनेकानेक मुत्सद्देगिरीची शस्त्र उपलब्ध आहेत. ती परजून त्यांचा चपखल वापर करणे गरजेचे आहे.

पाकची आर्थिक आणि सर्वच पातळ्यांवर कोंडी करायची, दहशतवाद्यांना मिळणारी विविध रसद बंद पाडायची, वेळप्रसंगी सर्जिकल स्ट्राईकचा मारा करायचा, अतिरेक्यांचे मनसुबे सफल होणार नाहीत अशी मजबूत सुरक्षा आणि गुप्तहेर यंत्रणा सज्ज ठेवायची, आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकला तोंडघशी पाडायचे अशा विविध आघाड्यांवर आपल्याला एकाचवेळी काम करावे लागणार आहे. त्यासाठी तज्ज्ञ, संशोधक आणि जाणकारांची फळी तयार करावी लागेल. त्यांच्याकडून येणाऱ्या सल्ल्यांना गांभीर्याने घेऊन कृती आराखडा निश्चित करता येईल. सैन्य दल, गुप्तहेर खाते आदींना मोकळीक देऊन इच्छित परिणाम साध्य करता येईल. भले हल्ल्याचा बदला घेण्यास काही कालावधी जाईल. पण त्याचा फार विचार करण्याची गरज नाही किंवा दबावाला बळी पडण्याचीही. एकाचवेळी विविध पातळ्यांवरील प्रभावी डावपेच यशस्वी होतील जेव्हा या साऱ्यात एकसूत्रता आणि समन्वय असेल. कुटील आणि धूर्त खेळींना अचूक डावपेचांनी आक्रमक उत्तर दिले, तर एकाच दगडात अनेक पक्षी मारले जातील.

शिवाय भविष्यकालीन हल्ल्यांचे नियोजन करणाऱ्यांना सुरुंगही लागेल. वर्तमान हा अपेक्षा आणि दबावाचा असला, तरी भविष्याचा विचार करूनच भारत सरकार आणि सैन्य दलांनी व्यूहनीती आखायला हवी. तसे झाले तर पहलगामचे हल्लेखोर, त्यांना बळ देणारे आणि खरे सूत्रधार हे सारेच गारद होतील. शिवाय शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ असून, भारताने केलेल्या कारवाईची जगभर यथोचित दखलही घेतली जाईल. जगाच्या दहशतवादविरोधी लढ्यात हा मैलाचा दगड ठरेल.

# चटकदार रीव्हर्स वडापाव



**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

**केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.**

**केसांसाठी**

नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -





**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.

**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.

**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.

**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

- **लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

- **तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

- **दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

- **लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या...**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे.

या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

# धकाधकीच्या जीवनात ग्रीन टीचे फायदे

**आजचे** धकाधकीचे जीवन, बदलती जीवनशैली, बदलते आहार यांमुळे अनेक आजार डोकं वर काढत आहेत. एवढंच नाही तर वाढत्या कामाच्या तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून ग्रीन टी नियमित पिणाऱ्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होताना दिसत आहे. योग्य आणि नियमित प्रमाणात ग्रीन टीचे सेवन शरीरास हितकारक ठरू शकते.




परंतु ग्रीन टीचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास ते आरोग्यास घातकदेखील ठरू शकते. ग्रीन टीमध्ये थेनाईन तत्त्व जास्त प्रमाणात असतात, त्यामुळे अमिनो ॲसिड बनते. अमिनो ॲसिड शरीरात ताजेपणा कायम ठेवण्यास मदत करते. तसेच तुम्हाला थकवा जाणवत नाही. सध्या तरुणांमध्ये आणि वृद्धांमध्ये कॅव्हिटीच्या समस्या वेगाने वाढत आहेत. ग्रीन टीमध्ये कॅफीन असते जे दातांवरील किटाणू मारण्यास सक्षम असते. बॅक्टेरिया कमी झाल्याने अधिक काळापर्यंत तुमचे दात चांगले राहतात. सतत वाढत्या कामामुळे, दररोजच्या व्यस्त वेळापत्रकामुळे रक्तदाबाच्या समस्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. रक्तदाबाचा त्रास असल्यास त्यावर ग्रीन टी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे हृदयरोग असणाऱ्यांसाठी ग्रीन टीचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करण्यासाठी ग्रीन टी उपयोगी ठरते. ग्रीन टी प्यायल्याने शरीरातील मेटाबॉलिज्म रेट वाढतो ज्यामुळे पाचनक्रिया सुरळीत होते.



# पिअर्सिंग करताना द्या 'या' गोष्टींकडे लक्ष

**बाजारामध्ये सध्या नवनवीन फॅशनचा ट्रेण्ड येत आहे. प्रत्येक ऋतूप्रमाणे हा ट्रेण्ड बदलत जातो. विशेष म्हणजे आजची तरुणाईदेखील हा फॅशन ट्रेण्ड उत्तमरित्या कॅरी करताना दिसत आहे. त्यातच मग पाहायला गेलं तर आज प्रत्येक तरुणाईच्या अंगावर टॅटू किंवा पिअर्सिंग दिसून येतात. अनेक जण आवड म्हणून तर काही जण केवळ फॅशन म्हणून या गोष्टी करतात. सध्या तरुणाईमध्ये पिअर्सिंगची मोठ्या प्रमाणावर क्रेझ दिसून येत आहे. मात्र, पिअर्सिंग करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. पिअर्सिंग म्हणजे शरीरावरील काही भागांवर रिंग किंवा अन्य एखादा दागिना टोचून घेणे. यामध्ये अनेक जण कान, नाक, भुवयी किंवा ओठांवर टोचून घेतात. मात्र, अनेक वेळा शरीरावर टोचून घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.**



- **संसर्ग होणे –**

पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासोबतच एखाद्या एक्सपर्ट व्यक्तीकडून हे करून घ्यावं. कारण अनेक वेळा हलगर्जीपणामुळे पिअर्सिंग करताना रक्तात संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर संसर्ग झाल्याची शक्यता निर्माण झाल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

- **ॲलर्जी होणे–**

विशिष्ट धातूंचा वापर करून शरीरावर बॉडी पिअर्सिंग करण्यात येतं. काही जणांची त्वचा सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे अशा व्यक्तींना या धातूपासून ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक वेळा बॉडी पिअर्सिंग केल्यानंतर सूज येणे, रॅशेस येणे यासारख्या समस्या निर्माण होतात.

- **अतिरिक्त रक्तस्त्राव–**

बॉडी पिअर्सिंग करतान कधी कधी सुई चुकीच्या ठिकाणी टोचली जाते. परिणामी, अशा ठिकाणाहून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेण्याची गरज असते.

- **तज्ज्ञ व्यक्तीकडून पिअर्सिंग करावे –**

पिअर्सिंग कधीही या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा योग्य प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावं. कमी अनुभवी व्य तकडून पिअर्सिंग करून घेतलं. तर त्याचा थेट परिणाम तुमच्या शरीरावर होऊ शकतो. चुकीच्या ठिकाणी पिअर्सिंग करून घेतल्या तर या ठिकाणचा भाग मृत होण्याची शक्यता असते.

# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम... अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं... त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डँड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.



# डायबेटिसपासून स्वताचे रक्षण करण्यासाठी हे टाळा

**सध्या जगातील सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे डायबेटिस... जगात भारत हा डायबेटिसचा मोठा बळी आहे. भारतात डायबेटिसग्रस्त लोकांची संख्या नवनवे आकडे पार करतेय. डायबेटिस पूर्णपणे बरा करता येत नसला तरी काही प्रमाणात रोखला जाऊ शकतो. त्यापासून स्वतःचे रक्षण करता येते. त्यामुळे तुम्ही या विकाराचे बळी होऊ नये म्हणून काही काळजी घेणे आवश्यक आहे.**



- **वजन घटवा**

तुम्ही जर स्थूल असाल तर तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करा. जास्त वजन हे डायबेटिस होण्यासाठी पूरक असते. वजन घटवल्याने शरीरात तयार होणाऱ्या इन्शुलिनमध्ये वाढ होते आणि त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

- **नाश्ता करा**

सकाळी उठल्यानंतर दोन ते तीन तासांत नाश्ता करण्याची सवय स्वतःला लावून घ्या. यामुळे डायबेटिसचा धोका कमी होण्यास मदत होते. नाश्ता करणे अजिबात टाळू नका.

- **तंतूमय (फायबर) पदार्थांचे सेवन करा**

आहारात फळे, भाज्या, डाळी आणि टणक कवचाच्या फळांचा समावेश करा. तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश असणे फार गरजेचे आहे. आहारातून शरीरात येणाऱ्या शर्करेचे प्रमाण कमी करण्यास हे पदार्थ मदत करतात.

- **शारीरिक व्यायाम**

नियमित व्यायाम करणे तुमच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. व्यायामामुळे केवळ वजन कमी होते असे नाही, तर शरीरात उत्पन्न होणारे इन्शुलिन योग्य पद्धतीने वापरले जाते. त्यामुळे डायबेटिसचा धोका कमी होतो.

- **धूम्रपान टाळा**

तुम्ही जर धूम्रपान करत असाल तर ते आताच बंद करा. टाईप २ चा डायबेटिस धूम्रपानामुळे होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असते. त्यामुळे या कारणाला बगल देणे गरजेचे आहे.



# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण

**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**




**विमानतळ,** रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे. ॲप्लाईड आणि इन्वॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉगी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

सशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करूनही प्लेट दोन मिनिटे धरली. त्या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरु शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

# अनधिकृत शाळा बिनबोभाट सुरूच... पालिका प्रशासनाच्या शाळांना केवळ सूचना

**■ठाणे :** ठाणे महापालिका हद्दीतील अनधिकृत असलेल्या ८१ शाळा अनधिकृत म्हणून घोषीत केल्या आहेत. तसेच काही शाळांच्या विरोधात फौजदारी कारवाई देखील केली आहे. परंतु असे असतानाही आजही अनेक शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश दिला जात असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. त्यामुळे महापालिकेने पुन्हा पालकांमध्ये अनधिकृत शाळांबाबत जनजागृती करण्याचा निर्णय घेतला असून आपल्या पाल्ल्यांचा त्या शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये असे आवाहन केले आहे. त्याचबरोबर ज्या शाळा अनधिकृत आहेत, त्यांनी त्या शाळा तत्काळ बंद कराव्यात, अशा सूचनाही महापालिकेच्या शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून दरवर्षी अनाधिकृत शाळांची यादी जाहीर केली जात आहे. त्यातही काही शाळांवर कारवाई होते, तर काही शाळा या सुरूच असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातही शाळा मंजुरीसाठी पत्रव्यवहार करण्यात आल्याचे सांगून खासगी अनधिकृत शाळेवाले विद्यार्थ्यांना प्रवेश देत आहेत. या शाळांची नोंदणी नाही, काही अनधिकृत शाळा अनधिकृत इमारतीत आहेत. काही अनधिकृत शाळा निवासी इमारतीत भाडेतत्त्वावर सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अनधिकृत शाळांच्या स्थितीचा नुकताच आढावा घेऊन शहरातील अनधिकृत शाळांवर कारवाईचे आदेश दिले होते.

परंतु आता पुन्हा नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने महापालिकेच्या शिक्षण विभागाने पुन्हा या ८१ शाळांची यादी जाहीर केली आहे. या शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेऊ नये, असे आवाहन केले आहे. या माध्यमातून जनजागृती देखील केली जात आहे. ठाणे महापालिकेने जाहीर केलेल्या अनधिकृत शाळांच्या यादीत दिव्यातील सर्वाधिक शाळांचा समावेश आहे. तसेच ८१ पैकी ७८ शाळा या इंग्रजी माध्यमाच्या असून हिंदीच्या दोन आणि मराठी माध्यमाच्या एका शाळेचा त्यात समावेश आहे.

**१९७०८ विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात**

अनधिकृत शाळांविरोधात प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारत ८१ अनधिकृत शाळांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या. त्यापैकी ६८ शाळांवर गुन्हे दाखल झाले आहेत. तर, १३ शाळांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ८१ अनधिकृत शाळा असून त्यात १९७०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी त्यांचे इतर अधिकृत खासगी शाळांमध्ये समायोजन करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न सुरू केले होते. मात्र काही कारणास्तव तेही केवळ कागदावरच असल्याचे म्हटले जात आहे. अनधिकृत शाळांबाबत पालिका प्रशासन कडक कारवाई का करत नाही, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.




**अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याची मनसेची मागणी**

भिवंडी पालिका प्रशासनाने शहरात १८ अनधिकृत प्राथमिक शाळा सुरू असल्याची यादी जाहीर केली असून अशा शाळांमधून पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश करू नये, असे आवाहन केले आहे. परंतु या शाळा गेल्या काही वर्षांपासून सुरू असून त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे या शाळा चालकांचे फावले असते. पालिका प्रशासनाने अशा अनधिकृत शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्या तत्काळ बंद कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र विद्यार्थी सेनेचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष परेश चौधरी यांनी पालिका आयुक्त अनमोल सागर यांना निवेदन देऊन केले आहे. अनधिकृत शाळांवर १ लाख रुपयांचा दंड व त्यानंतरही शाळा सुरू राहिल्यास प्रति दिवशी १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येईल, असे पत्र प्रशासनाने देऊनही या अनधिकृत शाळा बंद झाल्या नाहीत.

# भारतावर १० लाखांहून अधिक सायबर हल्ले

## पहलगाम हल्ल्यानंतर नोंद झाल्याचा महाराष्ट्र सायबर विभागाचा दावा

**■मुंबई :** जम्मू-कश्मीरमधील पाहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर विविध देशांतील हॅकिंग गटांनी भारताच्या सायबर प्रणालींवर १० लाखांहून अधिक ऑनलाइन हल्ले केल्याची नोंद महाराष्ट्र सायबर विभागाने केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



महाराष्ट्र पोलिसांच्या सायबर गुन्हे अन्वेषण विभागाने अनुभवले आहे की, २२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सायबर हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले.

पहलगाम हल्ल्यानंतर भारतावर १० लाखांहून अधिक सायबर हल्ले झाले, अशी माहिती महाराष्ट्र सायबर विभागाचे अतिरिक्त महासंचालक यशस्वी यादव यांनी दिली. भारताच्या वेबसाइट आणि पोर्टलवर हे हल्ले पाकिस्तान, मध्य पूर्व, इंडोनेशिया आणि मोरोक्को येथून करण्यात आले होते, असे त्यांनी सांगितले.

हे हल्ले करणारे अनेक हॅकिंग गट स्वतःला इस्लामी गट असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे हे सायबर युद्ध असण्याची शक्यताही नाकारता येत नाही, असे यादव म्हणाले.

या हल्ल्यांपैकी अनेक हल्ले महाराष्ट्र सायबर विभागाने निष्फळ ठरवले, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सरकारी विभागांनी आपली सायबर यंत्रणा बळकट करावी यासाठी महाराष्ट्र सायबर विभागाने एक सल्ला नोटी जारी केला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

२२ एप्रिल रोजी पहलगामजवळील बैसरन येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता.

# बंदरावर मासळी उतरविण्यावरून वाद



**■अलिबाग :** अलिबाग बंदरावर दुसऱ्या गावातील मच्छिमार आपली मच्छी उतरवित असल्याने अलिबाग बंदरावरील मच्छिमारांना मच्छी उतरविण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. यामुळे अलिबाग बंदरावर लावण्यात येणाऱ्या बाहेर गावच्या नौकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी अलिबाग बंदर येथील मच्छिमार बांधवांनी केली आहे.

अलिबाग बंदरावर साखर गावाच्या मासेमारी नौका मासे उतरवण्यासाठी व मासळी विक्रीसाठी येत असतात. अलिबाग येथील मच्छिमार संस्थेच्या एकूण ३०० ते ३५० नौका असून त्या नौका अलिबाग बंदरावर मासे उतरवण्यासाठी व विक्रीसाठी रोज येत असतात. अलिबाग जेट्टी ही ३०० ते ३५० नौकांच्या मासळी उतरवण्याच्या क्षमतेपेक्षा कमी आहे.

साखर या गावाच्या २० ते २५ नौका मासे उतरवण्यासाठी येतात, तसेच अलिबाग संस्थेच्या नौकांना मासे उतरवण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. लिबागचे नौकाधारक व बाहेरच्या नौका धारकांमध्ये मासळी उतरवण्यावरून मोठ्या प्रमाणात वादविवाद होत असतात. अलिबाग बंदरावर लावण्यात येणाऱ्या बाहेरील नौकांवर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**स्थानिक बंदर असूनही अलिबाग बंदराचा वापर**

साखर गावामध्ये मासळी उतरवण्यासाठी साखर आक्षी हे बंदर असून ते त्या बंदरावर मासे उतरवण्यासाठी व विक्रीसाठी तेथे नौका लावण्यात याव्यात. साखर गावामध्ये बंदर असूनसुद्धा ते अलिबाग बंदरावर मासळी उतरवण्यासाठी व विक्रीसाठी नौका घेऊन येतात, त्यामुळे नेहमी वाद विवाद होत असतात. त्यांना नेहमी वारंवार सांगून सुद्धा जाणूनबुजून अलिबाग बंदरावर बोटी लावल्या जातात.

# मिरा-भाईंदर शहरामधील ३८ इमारती अतिधोकादायक

**■भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेने शहरातील धोकादायक इमारतींची यादी आज जाहीर केली आहे. यामध्ये ३८ इमारती अत्यंत धोकादायक असल्याचे जाहीर केले आहे. यामध्ये मिरारोडच्या २४ इमारती आणि भाईंदरमधील १४ इमारतींचा समावेश आहे. यात प्रभाग एक ते सहा मिळून ३८ इमारती अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य इमारती आहेत. ३१ इमारती रिकाम्या करून दुरुस्ती करण्यास, ४२९ इमारती रिकामी न-करता दुरुस्ती करणे, १५ इमारतींची किरकोळ दुरुस्ती करायच्या आहेत. अशा मिळून मिरा-भाईंदर शहरात ५१३ इमारती धोकादायक आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग यांनी जुन्या जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा तपशील जाहीर केला आहे.

त्यात 'सी-१' अतिधोकादायक आणि राहण्यास अयोग्य इमारती अशा ३८ इमारती आहेत. 'सी-२ ए' इमारत रिकामी करून दुरुस्ती करणे अशा ३१ इमारती आहेत. 'सी -२ बी' इमारत रिकामी न-करता दुरुस्ती करणे अशा ४२९ इमारती आहेत. तर 'सी-३' इमारतीची किरकोळ दुरुस्ती या १५ इमारती आहेत, अशा एकूण ५१३ इमारती मिरा-भाईंदर शहरात आढळून आलेल्या आहेत. प्रभाग १ मध्ये ४ इमारती, प्रभाग २ मध्ये ३७, प्रभाग ३ मध्ये १०१, प्रभाग ४ मध्ये ११३, प्रभाग ५ मध्ये १७० व प्रभाग ६ मध्ये ८८ अशा मिळून ५१३ इमारती आहेत. इमारतीमध्ये राहण्यायोग्य नसलेल्या इमारतींना 'सी-१' श्रेणी म्हणून अत्यंत जीर्ण घोषित करून पाडण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. २०२४ या वर्षी ४३ इमारती 'सी- १' श्रेणीतील मोडकळीस आलेल्या इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या होत्या.

यावर्षी ज्या इमारतींचा धोकादायक इमारतीमध्ये घोषणा करण्यात आली आहे. त्या इमारतींवर तोडक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर धोकादायक अशा इमारतींना सातत्याने सूचना देऊनही अनेक जुन्या गृहनिर्माण सोसायट्या आपल्या इमारतींचा संरचनात्मक अहवाल महापालिकेला सादर करत नाहीत. त्यामुळे केव्हाही मोठी दुर्घटना घडण्याची भीती असल्याने ही बाब गांभीर्याने घेत ३० वर्षे किंवा त्याहून अधिक जुन्या इमारतींचा संरचनात्मक अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाकडे दुर्लक्ष केल्यास अशा इमारती थेट मोडकळीस आलेल्या इमारतींच्या यादीत समाविष्ट केल्या जातील, असे अतिरिक्त आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे यांनी सांगितले आहे.

**सोसायट्यांनी संरचनात्मक अहवाल न-केल्यास पालिका करणार**

तसेच ज्या इमारतीचे संरचनात्मक अहवाल (ऑडीट) झालेले नाही. अशा इमारतींचे ऑडिट मनपाने आता स्वतःच करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्याचा सर्व खर्च संबंधित इमारतीकडून वसूल करावा किंवा संबंधित सोसायटीच्या मालमत्ता करदेयकात जोडून वसूल करण्याचे आदेश दिलेले आहेत.



# भाईंदरमध्ये मोटार वाहने फसवणूक प्रकरणी २४६ वाहने जप्त

**■भाईंदर :** मिरा -भाईंदर मध्ये वाहने भाड्याने लावून त्यातून मोबदला देण्याच्या नावाखाली फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला होता .त्यानंतर काशीमिरा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी सदरील गुन्ह्यात तपास करून २४६ वाहने जप्त करत मुख्य आरोपीला बेड्या ठोकत सदरील घोटाळा उघडकीस आणला आहे. तसेच आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. आरोपीने नवीन गाड्या शोरुममध्ये बुक करुन सदरच्या गाड्या या मुंबई एअरपोर्ट आणि जेएनपीटी बंदर येथे भाड्याने लावून प्रत्येक गाडीचे ५५ ते ७५ हजार रुपये भाडे मिळेल आणि भाडयाचे रक्कमेतून कजार्चा हप्ता वगळता उर्वरित रक्कम प्रत्येक गाडीमागे भाडे देतो अशी स्किम सांगून बुकींगसाठी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनामा करुन रोख रक्कम तसेच बँक खात्यात ऑनलाईन पैसे स्विकारले. सुरूवातीस तक्रारदार आणि साक्षीदार यांना गाडीचे भाडे म्हणून रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करुन तक्रारदारांचा विश्वास संपादन करुन गाडीच्या बुकींगसाठी घेतलेली रक्कम आणि गाड्यांचा अपहार करुन आर्थीक फसवणूक केली होती.



**फसवणुकीचे १३ गुन्हे दाखल**

आरोपीवर यापूर्वी कुरार पोलीस ठाणे, नाशिक शहर आर्थिक गुन्हे विभाग, अंकलेश्वर पोलीस ठाणे गुजरात, मुंबईतील बांद्रा पोलीस ठाणे, बीकेसी पोलीस ठाणे, ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा मुंबई येथे -२ व गुन्हे शाखा मुंबई येथे -२ आणि भोसरी पोलीस ठाणे, पुणे, नेरूळ पोलीस ठाणे, नवी मुंबई इथे एकूण १३ गुन्हे दाखल आहेत.

सदरील गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितल मुंढे करत आहेत. तपासादरम्यान मुख्य आरोपी राजु राजीव जोशी या बनावट नावाने तक्रारदार व साक्षीदार यांना स्वतःची ओळख सांगितली होती. परंतु, तपासादरम्यान त्याचे खरे नांव संदिप सुरेश कांदळकर (रा.गणेशवाडी, नवशी, पो. पिसई, ता. दापोली जि. रत्नागिरी) हे असून त्याला २४ एप्रिल रोजी अटक केली होती. तसेच त्याचा साथीदार सचिन सुनिल तेटगुरे (रा. दापोली, जि. रत्नागिरी) यास २३ एप्रिल रोजी अटक केली आहे. तसेच इतर ७ आरोपी निष्पन्न असून त्याच्याकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास सुरु केला आहे. मुख्य आरोपी संदिप कांदळकर याने सह आरोपी यांच्या संगनमताने अंदाजे १३७५ गुंतवणुकदारांची २० कोटी ६० लाख रुपयांची आर्थीक फसवणूक केली आहे. आरोपीने आजपर्यंत २५० मोटार वाहनांचा (पिकअप टॅम्पो व कार-चारचाकी वाहने) अपहार केल्याचे निष्पन्न झाले असून अद्याप साक्षीदार तक्रार करण्यास येत आहेत. अपहरीत वाहने आणि फसवणुकीचे रक्कमेत वाढ होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. आजपर्यंत गुन्हयातील अपहरीत वाहनांपैकी २४६ मोटार वाहने अंदाजे किंमत २५ कोटी रुपयांची हस्तगत केली असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.सदरची कारवाई ही पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त विजयकुमार मराठे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, काशिमीरा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत केली आहे.

# विदेशी गांजा हायड्रोप्रकरणी अटक

**■नवी मुंबई :** हायड्रो या विदेशी गांजा तस्करी प्रकरणी एका राष्ट्रीय हॉकीपटू दोन पोलीस कर्मचारी, यांच्यासह एकूण दहा जणांना नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ७३ लाख ९३ हजारे ५ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही टोळी सहा महिन्यांपासून कार्यरत होती.



आशिष रमेश गवारे, अहमद खालेद ऑलगी, साहील शब्बीर लांबे, सुजित रघुनाथ बंगेरा, कमल जयकिशन चांदवाणी, सचिन बाबुराव भालेराव, संजय फुलकर, अंकित पितांबरभाई पटेल, टिकुंदकुमार दिनेशभाई पटेल प्रशांत विनोद गौर असे अटक संशयीतांची नावे आहेत.

१४ एप्रिलला नेरूळ सेक्टर १५ येथे काही लोक गांजाचा व्यवहार करणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर धाड टाकण्यात आली. त्यावेळी आशिष रमेश गवारे आणि अहमद खालेद ऑलगी हे पोलिसांच्या हाती लागले तर आकाश मौर्य हा पळून जाण्यात यशस्वी झाला. अटक आरोपीकडून १ लाख ७१ हजार ९०० रुपयांचा १७. १९ ग्रॅम वजनाचा हायड्रो हा विदेशी गांजा, १ लाख १ हजार ५०० रुपयांचा १ किलो १५ ग्रॅम वजनाचा गांजा, ५०० रुपयांचा वजन काटा, १५०० रुपयांचे क्रशर, १ हजार रुपयांचे छोटे प्लास्टिक पारदर्शक बॉक्सचे दहा मग व अन्य काही साहित्य असा एकूण २ लाख ७६ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आले होते.

या दोघांच्या अटकेनंतर हा आवाका मोठा असल्याचे लक्षात आल्यावर आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या निर्देशानुसार विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली होती.

> "अटक पोलीस कर्मचाऱ्यांच्या मालमत्ता चौकशी केली जाणार आहे. या प्रकरणात अन्य १२ नावे संशयाच्या भोवऱ्यात आहेत. त्यांच्याबाबत चौकशी सुरू आहे. यात नेमके कोण कोण आहेत ही माहिती देणे घाईचे ठरेल."
>
> **- अमित काळे, पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा**

# भीम बांधावर पर्यटक महिलेचा पाण्यात बुडून मृत्यू

**■डहाणू :** डहाणू तालुक्यातील वाघाडी येथील ऐतिहासिक भीम बांधावर गुरुवारी एक दुर्दैवी घटना घडली. पाण्यात बुडालेल्या महिला पर्यटकाचा मृतदेह तब्बल १८ तासांच्या अथक शोधानंतर शुक्रवारी सकाळी बाहेर काढण्यात आला. मृत महिलेचे नाव मीना पराड (वय ३९, रा. धानिरी, डहाणू) असे असून त्या आपल्या कुटुंबासह पर्यटनासाठी आलेल्या होत्या.गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास मीना पराड या पोहण्यासाठी पाण्यात उतरल्या असता, पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने त्या काही क्षणांतच खोल पाण्यात ओढल्या गेल्या. घटनेनंतर वाघाडी पोलीस, ग्रामस्थ आणि पाणबुड्यांनी रात्रभर शोधमोहीम सुरू ठेवली. अखेर शुक्रवारी सकाळी मृतदेह सापडून कासा उपजिल्हा रुग्णालयात स्वविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. त्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला.



**पर्यटनाचा आनंद, पण सुरक्षिततेच्या अधीन**

दरवर्षी महालक्ष्मी यात्रेच्या काळात आणि उन्हाळी सुट्टीमध्ये पालघर, नाशिक, गुजरात, सिलवासा येथून मोठ्या प्रमाणावर पर्यटक भीम बांधावर येत असतात. मात्र, पाण्याच्या खोलीची माहिती नसल्याने बुडून मृत्यूच्या घटना घडतात. त्यामुळे ग्रामपंचायतमार्फत जलरक्षकांची नेमणूक, सूचना फलकांची निगा आणि सुरक्षेसाठी आवश्यक ती पावले उचलावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

भीम बांध हे निसर्गरम्य पर्यटनस्थळ असून, दररोज येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते. मात्र, सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नसल्यानं हे ठिकाण धोकादायक ठरत आहे. बांधाखाली अंदाजे ४० ते ५० फूट पाणी असून, वेगवान प्रवाहामुळे अपघातांची शक्यता अधिक आहे. या ठिकाणी सूचना फलक, जीवरक्षक किंवा सुरक्षा कर्मचार्यांची व्यवस्था नसल्याने दरवर्षी बुडून मृत्यूच्या घटना घडत आहेत.

या घटनेनंतर ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींनी तातडीने सुरक्षेच्या उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी केली आहे. भीम बांधावर वर्षभर पर्यटक येत असले तरी ग्रामपंचायत आणि प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने फारशी काळजी घेतली जात नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. सरपंचांच्या मते, सूचना फलक लावले जातात, मात्र मद्यप्राशन करणारे काही पर्यटक फलक तोडून टाकतात, त्यामुळे कायमस्वरूपी देखरेख आवश्यक आहे.

# पुण्यात पुन्हा हिट अँड रन! भरधाव मर्सिडिझने दुचाकीस्वाराला उडवले, एकाचा मृत्यू

**■पुणे :** पुण्यातील नवले ब्रिजजवळ एका भरधाव वेगात जाणाऱ्या मर्सिडिझ कारने दुचाकीस्वाराला उडवले असून त्यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला असून एक जण जखमी झाला आहे.



शुभम भोसले आणि त्याचे मित्र निखिल रानडे, श्रेयस सोळंखी आणि वेदांत इंद्रसिंग राजपूत या चौघांनी हिंजवडी परिसरात मद्यसेवन केले. त्यानंतर पुणे बंगळुरू महामार्गावरून कात्रजच्या बोगद्याच्या दिशेने जात असताना शुभम भोसले याने नशेतच दुचाकीला धडक दिली. त्यात कुणाल हुशार या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर त्याचा मित्र प्रज्योत पुजारी हा जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पुण्यातील सिंहगड रोड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारमधील मद्यधुंद चालकासह चार तरुणांची वैद्यकीय चाचणी करण्यात आलेली नाही. आरोपींना वाचवण्याचा पोलिसांचा प्रयत्न असल्याचा आरोप अपघातात मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी केला आहे.

# लाच घेताना पोलीस उपनिरीक्षकाला अटक

**■भाईंदर :** मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रामनाथ ठमाजी तांदळकर (५६) यांनी आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती.याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी शुक्रवारी रात्री रामनाथ तांदळकर यांना ५० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. तक्रारदाराच्या भावा विरुद्ध नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दाखल गुन्ह्यात आरोपीला १९ एप्रिल २०२५ रोजी अटक केली आहे. तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक रामनाथ तांदळकर पोलीस उपनिरीक्षक यांनी आरोपीची जामिनावर सुटका करण्यासाठी व चांगला तपास अधिकारी न्यायालयात देण्यासाठी ७० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदारांनी २३ एप्रिल रोजी याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडे केली होती.




त्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक तांदळकर यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ५० हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार शुक्रवारी रात्री करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तांदळकर यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेल्या लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष ५० हजार रुपये तक्रारदार यांच्याकडून घेतली आहे. लोकसेवक तांदळकर यांना लाच घेताना रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले आहे. तांदळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांचे पोलीस निरीक्षक विजय कावळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दिनकर नलावडे, पोलीस हवालदार योगेंद्र परदेशी, अनिल उगले, गणपते, पोलीस शिपाई चालक अहीरे यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com